## नियमीत दरखास्त क्र.९१/१९९१ मधील
## निशाणी क्र.७० वर आदेश

**CNRNO.MHLA110000181991.**

०१. सदरचा अर्ज धनकोंनी कब्जा वॉरंट काढण्याकरिता दाखल केलेला आहे.

०२. सदर अर्जाला ऋणकोंनी नि.क्र.८३ ला म्हणणे दाखल करुन तिव्र विरोध दर्शविलेला आहे. सदर म्हणण्यामधील थोडक्यात कथन असे आहे की, अर्ज योग्य व कायदेशीर नाही. हुकूमनाम्याच्या वेळी असलेली मिळकतीची परिस्थिती व सध्याची परिस्थिती भिन्न आहे. त्यामुळे सदर ऋणकोंनी मा. उच्च न्यायालयामध्ये दुसरे अपील दाखल केलेले आहे. प्रकरणातील हुकूमनाम्यात नमूद केल्याप्रमाणे ० हे. ३३ गुंठे जमिन सर्वे नं.४/अ मध्ये अस्तित्वात नव्हती. त्यामुळे धनको हे सदर ० हे. ३३ आर जमिनीचा कब्जा मिळण्यास पात्र नाहीत. तसेच नि.दि.दा.क्र.२७७/७९ मध्ये मिळकतींची संयुक्त मोजणी झालेली नाही. धनकोंनी मिळकतींची संयुक्त मोजणी केल्यास व संयुक्त मोजणीमध्ये अतिक्रमण आढळुन आल्यास सदर ऋणको हे अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा देण्यास तयार आहेत. तसेच संयुक्त बांध आजरोजी अस्तित्वात नाही. त्यामुळे सदर प्रकरणातील हुकूमनाम्याची अंमलबजावणी होऊ शकत नाही. सदर ऋणकोंनी नि.क्र.७२ वरील आदेशाविरुद्ध मा. उच्च न्यायालयामध्ये दाद मागितलेली आहे. तसेच ऋणकोंनी दाखल केलेले दुसरे अपील देखील प्रलंबित आहे. त्यामुळे अपील प्रलंबित असताना या न्यायालयाला कोणताही आदेश पारीत करता येत नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची अथवा प्रकरण स्थगीत ठेवण्याची ऋणकोंनी

शेवटी मागणी केलेली आहे.

०३. सदर प्रकरणातील धनकोंतर्फे विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला. सदर प्रकरणातील ऋणकोंना युक्तिवाद करण्यासाठी पुरेसी संधी देऊन देखील श्रणकोंतर्फे युक्तिवाद करण्यात आलेला नाही. तसेच मुदतीचा अर्ज देखील दाखल नाही. सदर प्रकरणाचा प्रलंबित कालावधी व ऋणकोंची गैरहजेरी विचारात घेऊन प्रकरण ऋणकोंच्या युक्तिवादाशिवाय आदेशाकरिता घेण्यात आलेला आहे.

०४. सदर प्रकरणात दाखल केलेल्या कागदपत्रावरुन सर्वप्रथम याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, सदर दरखास्त प्रकरण धनकोंनी नि.दि.दा.क्र.२७७/७९ मधील हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरिता दाखल केलेला आहे. सदर नि.दि.दा.क्र. २७७/७९ मधील हुकूमनामा हा ऋणकोंनी धनकोंना हुकूमनाम्यात नमुद मिळकतीचा कब्जा देण्याबाबतचा आहे. सदर प्रकरणातील ऋणकोंनी हरकतीद्वारे हुकूमनाम्याविरुद्ध मा. उच्च न्यायालयामध्ये दाद मागितल्याचे कथन केलेले आहे. परंतु सदर प्रकरणाला मा. उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा प्रकरणामध्ये दाखल केलेला नाही. तसेच ऋणकोंनी नि.क्र.७२ वरील अर्जाद्वारे उपस्थित केलेल्या हरकती देखील नामंजुर करण्यात आलेल्या आहेत. सदर नि.क्र.७२ वरील आदेशाविरुद्ध

देखील ऋणकोंनी मा. उच्च न्यायालयामध्ये दाद मागितल्याचे कथन केलेले आहे. परंतु आजतागायत ऋणकोंनी नि.क्र.७२ वरील आदेश रद्द केल्याबाबत अथवा प्रकरण स्थगित केल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

०५. तसेच सदर प्रकरणातील ऋणकोंनी म्हणण्याद्वारे नि.दि.दा.क्र.२७७/ ७९ मधील मिळकतीच्या मोजणीबाबत वाद उपस्थित केलेला नाही. त्यामुळे याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, नि.दि.दा.क्र.२७७/७९ मधील हुकूमनामा अद्यापपर्यंत कोणत्याही न्यायालयाने रद्द केलेला नाही. तसेच हुकूमनामा अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयावर हुकूमनामा ज्याप्रकारे आहे, त्याप्रकारे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आहे. तसेच हुकूमनामा अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाला हुकूनाम्याच्या पाठीमागे अथवा बाहेर जाऊन आदेश पारीत करता येत नाही. तसेच नि.दि.दा.क्र.२७७/७९ मधील दाव्याचा निकाल गुणदोषावर झाल्याचे दाखल कागदपत्रावरुन स्पष्ट होते. त्यामुळे सदर ऋणकोंना नि.दि.दा.क्र.२७७/७९ मधील हुकूमनाम्याबाबत अथवा मोजणीबाबत प्रस्तुत प्रकरणामध्ये वाद उपस्थित करण्याचा अधिकार प्राप्त होत नाही.

०६. सदर प्रकरणातील ऋणकोंनी म्हणण्याद्वारे दुसरे अपील प्रलंबित

असल्यामुळे प्रकरण स्थगीत करण्याची मागणी केलेली आहे. सदर दरखास्त प्रकरण मा. उच्च न्यायालयाने स्थगित केल्याबाबत कोणताही आदेश ऋणकोंनी प्रकरणात दाखल केलेला नाही. तसेच याठिकाणी नमुद करणे आवश्यक वाटते की, कोणत्याही प्रकरणामध्ये मा. वरीष्ठ न्यायालयाने पारीत केलेला स्थगिती आदेश हा केवळ सहा महिन्याच्या कालावधीकरिता चालु राहु शकत असुन मा. वरीष्ठ न्यायालयाने पुढील कालावधीकरिता स्थगिती आदेश वाढविल्याशिवाय सदर आदेशाचा अंमल राहणार नाही असे मा. सर्वोच्च न्यायालयाने *एशियन रिसर्फेसिंग ऑफ रोड एजंसी वि. सीबीआय, निकाल दि.२८/०३/२०१८* मध्ये निष्कर्ष नोंदविले आहेत. प्रस्तुत प्रकरणामध्ये मा. वरीष्ठ न्यायालयाचा कोणताही स्थगिती आदेश पारीत असल्याबाबत ऋणकोंनी कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे स्थगिती आदेश सहा महिन्यापेक्षा जास्ती कालावधीकरिता अंमलात असण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच सदर प्रकरण सन १९९१ पासुन म्हणजेच २० वर्षापेक्षा जास्ती कालावधीपासुन प्रलंबित असुन सदर प्रकरणातील धनकोंना हुकूमनाम्याचे फळ मिळण्यासाठी हुकूमनाम्याची अंमलबजावणी लवकरात लवकर होणे आवश्यक आहे. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २१ नियम ३५ खालील तरतुदीनुसार हुकूमनाम्याप्रमाणे कब्जा वॉरंट काढण्याबाबत आदेश पारीत करणे न्यायोचित होणार आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे.

सबब, मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

दिवाणी प्रक्रिया संहिता नियम २१ आदेश ३५ खालील तरतुदीनुसार नि.दि.दा.क्र.२७७/१९७९ मधील हुकूमनाम्यानुसार कब्जा वॉरंट काढण्यात यावा.

स्वा/-

दि. १४.०८.२०१९.

(शि. म. गौरगोंड)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,निलंगा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M.N. Yenge |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D Court (Shivkant M. Gourgond) |
| Date of Judgment/Order | : | 14.08.2019 |
| Judgment/Order signed by presiding officer | : | 14.08.2019 |
| Judgment/Order uploaded on | : | 16.08.2019 |